महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ चे कलम ८१ अन्वये इंदापूर व नगरपालिकेच्या जनरल बोर्डाची विशेष सभा सोमवार दिनांक १८.१०.१९९३ रोजी दुपारी ४-०० वाजता पालिकेच्या इमारती शिवाजीराजे सभागृहात आयोजित करणेत येऊन सभेत खालील प्रमाणे ठराव पास करणेत आले. - -

- सभेस हजर सभासद- २३ पैकी १९ -

विषय नं. २:- मा. चेअरमन, विपश्य एज्युकेशन सोसायटी, इंदापूर या संस्थेचे प्रियदर्शिनी इंग्लिश मेडियम स्कूल इमारत बांधकाम करणेसाठी इंदापूर नगरपरिषद मालकीची जमीन हस्तांतरण करणे बाबत आलेल्या दिनांक २५.९.९३ रोजीच्या पत्राचा विचार करणे व निर्णय घेणे.

ठराव नं. २:- मा. चेअरमन, विपश्य एज्युकेशन सोसायटी इंदापूर यांनी दि. २५.९.१९९३ रोजीचे इंदापूर नगरपालिकेकडे पत्र पाठवून इंग्लिश मेडियम स्कूल साठी इमारत बांधकाम करणेसाठी ~~xxxxx~~ नगरपालिका मालकीची जागा मिळावी म्हणून मागणी केलेली ते पत्र सभेस वाचून दाखविणेत आले. सदर पत्राचा विचार करता असे ठरविणेत येते की, इंदापूर नगरपालिका मालकीची शेतीकडील सर्व्हे नंबर ८०३ मधील नाशिक मार्गालगत पड जमिन एकूण २० गुंठे विपश्य एज्युकेशन सोसायटी इंदापूर या संस्थेस सदर संस्थेच्या इंग्लिश मेडियम स्कूलसाठीचे नियोजित इमारत बांधकामाकरिता भाडेपट्ट्याने हस्तांतरण करणेस मंजूरी देणेत येत आहे. सदर संस्थेशी भाडेपट्ट्याचा करारनामा हा योग्य त्या स्टँप पेपरवर केवळ शाळा बांधकाम करणेचे प्रयोजनासाठीच ९ वर्षे मुदतीसाठी दरमहा भाडे प्रति चौरस फुटास ००=०५ पै. या दराप्रमाणे आकारणी राहील म्हणून करणेत यावा. व नियमानुसार मा. जिल्हाधिकारी यांचेकडे प्रस्ताव पाठवून मान्यता घेऊन जागा ताब्यात देणे व करारनामा करून घ्यावा.

~~ठराव-सर्वानुमते-मंजूर.~~

ठराव मांडणार- मा. ताटे कृष्णा लक्ष्मण.
अनुमोदन देणार- मा. पवार उध्दव जनार्दन

ठराव सर्वानुमते मंजूर.
सही /- xxx
अध्यक्ष,
इंदापूर नगरपालिका.

---

" खरी नक्कल "

मुख्याधिकारी,
इंदापूर नगरपालिका.